# ग्राहक आणि तंत्रज्ञानातील समन्वयामुळे फिनटेकला यश

**मुंबई** : ग्राहक आणि तंत्रज्ञान यांच्यातील सहयोग हा फिनटेक उद्योगाच्या यशाचा मुख्य घटक आहे, असे अक्षत खेतान, संस्थापक, एयू कॉर्पोरेट आणि लीगल ॲडवायजरी सर्विसेस लिमिटेड यांनी नवव्या जीईएस ग्लोबल इकॉनॉमिक समिटमध्ये मुंबईत वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये 'फिनटेक - डिजिटल क्रांतीला गती देणे' या विषयावर मुख्य भाषणात सांगितले. या कार्यक्रमात फिनटेकसह इतर क्षेत्रातील प्रमुखांनी फिनटेकच्या भविष्यावर आणि डिजिटल क्रांतीवरील प्रभावावर चर्चा केली.